"अंतरी पेटवू ज्ञानज्योत"
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

जा.क्र.उमवि/९२/७/३८/५१७७ दि. २.६.९२

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न
असलेले सर्व महाविद्यालयातील मा.प्राचार्य
आणि मान्यताप्राप्त संस्थांचे मा.संचालक.

विषय :- विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.....
प्रथम व द्वितीय वर्षासाठी महाविद्यालयांनी
शिकवावयाच्या अभ्यासक्रमा बाबत व परीक्षा-
बाबत....

महोदय,

अभ्यासक्रमाच्या बाबतीत कळविण्यात येते की, संबंधीत अधिकार मंडळांची यथावकाश मान्यता घेऊन त्या त्या विषयांचा अभ्यासक्रम रचित व पुर्नरचित केल्या बद्दल विद्यापीठाकडून परीपत्रक निघाल्या शिवाय अभ्यासक्रम बदलला असे समजू नये, उमवि कायद्याच्या कलम ११२[२] अन्वये जो पर्यंत उमवि असा बदल केल्याचे अधिकृतपणे कळवित नाही तोपर्यंत बदल करु नये असे यापूर्वी उमवि परीपत्रक क्र.९१/३२/३०१, दि. २.२.९१ परीपत्रक क्र.१२/९१ दि. १८ जून, ९१ पत्र क्र.उमवि/९१/३८/१२९५ दि. ११ जुलै, ९१ व उमवि/९१/३८/१८२२ दि. २२ ऑगष्ट, ९१ इ.अन्वये कळविण्यात आलेले आहे. पुन:श्च स्पष्ट करण्यात येत आहे की, हे परीपत्रक विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षासाठी शिकवावयाच्या अभ्यासक्रमा-बाबतीत व परीक्षा घेणे बाबतीत लागू आहे.

विविध विद्याशाखांमध्ये प्रथम व द्वितीय वर्षासाठी आपल्या महाविद्यालयात सन ९०-९१ या शैक्षणिक वर्षात जो अभ्यासक्रम शिकविला जात होता तोच अभ्यासक्रम या वर्षी म्हणजे ९२-९३ करीता शिकवावयाचा आहे. या अभ्यासक्रमात सन ९१-९२ या शैक्षणिक वर्षामध्ये जून, ९२ पासून उमवि ने काही अभ्यासक्रम सुधारीत केलेले आहेत त्या अभ्यासक्रमांच्या प्रती आपणाकडे यापूर्वीच पाठविण्यात आलेल्या आहेत. तद्नुषंगाने सुधारीत अभ्यासक्रम उमविने बदल केल्यामुळे त्यानुसार शिकवायचे आहेत. इतर अभ्यासक्रम पुणे विद्यापीठाप्रमाणेच राहतील व त्याबाबतीत जो पर्यंत उमवि बदल करीत नाही तोपर्यंत ते तेच अंमलात राहतील.

मागील वर्षी म्हणजे सन ९०-९१ या शैक्षणिक वर्षात बी.ए./ बी.एस्सी./बी.कॉम. या सारख्या विविध पदवी अभ्यासक्रमासाठी, प्रथम व द्वितीय वर्षासाठी तसेच एम.ए./एम.एस्सी./ एम.कॉम. या सारख्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रथम व द्वितीय वर्षासाठी जो अभ्यासक्रम शिकविला जात होता तोच अभ्यासक्रम [उमविने त्यात बदल केला तो बदल गृहीत धरुन] चालू वर्षात म्हणजे सन ९२-९३ या शैक्षणिक वर्षात शिकवावयाचा आहे. त्याच अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्नपत्रिका राहील.त्यानुसारच सन १९९२-९३ च्या प्रथम, द्वितीय व पदव्युत्तर वर्गाच्या परीक्षा घेण्यात येतील.

तसेच पुणे विद्यापीठाने यापूर्वी जाहिर केल्यानुसार ९०-९१ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध अभ्यासक्रमाच्या बाबतीत जे विषयगट निश्चित केलेले आहेत तेच विषय गट जोपर्यंत उमवि अधिकार मंडळ त्यात कोणताही बदल सुचवीत नाही तो पर्यंत [९०-९१ या शैक्षणिक वर्षातील विषय गट] तसेच कायम राहतील. या विषय गटांच्या बाबतीत पुणे विद्यापीठाने यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी त्या त्या विषय गटातील विषय निवडले पाहिजेत.पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे विषय गटाच्या व्यतिरीक्त विषय घेतल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांवर राहील.

एफ.वाय बी.कॉम ह्या वर्गाच्या विषय गटाच्या संदर्भात उमवि परीपत्रक क्र.३०/ उमवि/९२/२६/१२६६ दि. ६.२.९२ अन्वये सन १९९२-९३ साठी निश्चित करण्यात आलेले गटाचे परीपत्रक पाठविलेले आहे,त्यानुसारच विद्यार्थ्यांनी विषय निवडावेत.प्रथमवर्ष बी.ए.चे गट सोबत जोडल्याप्रमाणे आहेत.

म.कळावे,

आपला विश्वासू,

सहा.कुलसचिव
[परीक्षा]

प्रत माहितीसाठी सादर रवाना-

१] मा.कुलगुरुंचे -स्वीय सहाय्यक
२] मा.वित्त अधिकारी
३] मा.उपकुलसचिव - शैक्षणिक /परीक्षा
४] मा.सहा.कुलसचिव -शैक्षणिक/पात्रता/संलग्नीकरण
५] मा.कक्षाधिकारी - शैक्षणिक /पात्रता/परीक्षा/संलग्नीकरण